# यात्रा व्यवस्थापन



## सन २०१७

## प्रमाणीत अमंलबजावणी कार्यप्रणाली

## जिल्हा लातूर

**जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय**

**(जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण)**

---

# यात्रा व्यवस्थापन

## प्रमाणीत अमंलबजावणी कार्यप्रणाली

## जिल्हा लातूर

अनुक्रमणिका


| तपशिल | पान क्रमांक |
|---|---|
| विभाग निहाय समन्वय अधिकारी | ३-५ |
| जिल्हयातील यात्रांची यादी | ६-१३ |
| प्रमाणीत अमंलबजावणी कार्यप्रणाली | १३-१९ |
| पडताळणी यादी (चेकलिस्ट) | २०-२४ |
| यात्रा व्यवस्थापन | २५-३० |

# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय

## (जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण)

---

**जिल्हास्तरीय विभाग निहाय समन्वय अधिकारी**

| अ.क्र | नांव | पदनाम | कार्यालयाचे नाव | भ्रमणध्वनी |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. एन. आर. केंद्रे | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) | जिल्हा परिषद | ०२३८२-२४२९९१<br>७०६६०५८५८६ |
| २ | श्री. लता फड | अपर पोलीस अधिक्षक | पोलीस अधिक्षक | ०२३८२-२४३२४५ |
| ३ | श्री. वासनिक | अधिक्षक अभियंता | म.रा.वि.वि.कं.म. लातूर | ०२३८२-२४५३२९ |
| ४ | श्री. नरसिंग भंडे | कार्यकारी अभियंता | सार्वजनकि बांधकाम विभाग, लातूर | ०२३८२-२००८६८ |
| ५ | डॉ. श्रीधर पाठक | निवासी वैद्यकीय अधिकारी | आरोग्य विभाग | ०२३८२-२४९१८३<br>९४२२४६९६४० |
| ६ | श्री. व्ही .के. खरात | पो. उप. अ. लातूर शहर | पोलीस विभाग | ०२३८२- २४३४०२<br>९८९२६१७३०३ |
| ७ | श्री. संभाजी वाघमारे | उपायुक्त मनपा लातूर | मनपा विभाग | ०२३८२-२४६०७४ |

# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय

## (जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण)

---

**तालुका स्तरीय नोडल ऑफीसर**

| अ.क्र | तहसिलदार यांचे नांव | तहसिल कार्यालयचे नांव | भ्रमणध्वनी | कार्यालय दूरध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. संजय वारकड | लातूर | ९४२१३३८०३३ | २४२९६२ |
| २ | श्रीमती. मंजुषा लटपटे | रेणापूर | ९४२१२७१९३६ | २३३३९४ |
| ३ | श्रीमती. अहिल्या गाठाळ | औसा | ९०४९००३६६९ | २२२०२६ |
| ४ | श्रीमती. राजश्री मोरे | उदगीर | ९४२२१३२२७९ | २५५५६७ |
| ५ | श्री. प्रविण मेंगशेट्टी | अहमदपूर | ९४२२७६९४३२ | २६२०३० |
| ६ | श्री. भरत सुर्यवंशी | चाकुर | ९६२३३९८५५९ | २५२१६१ |
| ७ | श्री. विक्रम देशमुख | निलंगा | ९४२२२४७३९९ | २४२०२४ |
| ८ | डॉ. सौ. शिवनंदा लंगडापूरे | जळकोट | ९४२१५७१७८३ | २७५५८५ |
| ९ | श्री.जे.के. कांबळे | देवणी | ८६९८९९५०९२ | २६९४४४ |
| १० | प्रभारी श्री. सय्यद अरिफ | शिरुर अनंतपाळ | ९४२२६१२१९८ | २५०२२५ |

# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
## (जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण)

---

## गट विकास अधिकारी

| अ.क्र. | अधिका-यांचे नांव | पदनाम | कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक | मोबाई क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. डी. एच. दाईगडे | गट विकास अधिकारी लातूर | ०२३८२ - २४२९९० | ७५८८५८६७०९ |
| २ | श्री. भालके. टी. के | गट विकास अधिकारी औसा | ०२३८३ -२२२०३१ | ९०११०९५७३३ |
| ३ | श्री. व्ही. जी. लोखंडे | गट विकास अधिकारी रेणापुर | ०२३८२ -२३३३९६ | ९४२१२७७४५७ |
| ४ | श्री. एस. ए. राउत | गट विकास अधिकारी उदगीर | ०२३८५ -२५६०२९ | ९६७३०९७२५२ |
| ५ | श्री. एन. एस दाताळ | गट विकास अधिकारी अहमदपुर | ०२३८१ -२६२०२७ | ९४०३२४६६२४ |
| ६ | श्री. एन. एस. शेरखाने | गट विकास अधिकारी चाकुर | ०२३८१ -२५८१४४ | ९४२२८१६४७० |
| ७ | श्रीमती. ए. एन. गावडे | गट विकास अधिकारी जळकोट | ०२३८५ -२७५७७६ | ९८२२७८०४६७ |
| ८ | श्री. एस.ए. अकोले | गट विकास अधिकारी देवणी | ०२३८५- २६९९०० | ९४२३३४९४४७ |
| ९ | श्री. आर. व्ही. मुक्कावार | अति. गट विकास अधिकारी निलंगा | ०२३८४ -२४२०३३ | ९४२२६५७९३६ |
| १० | श्री. एम. डी. धस | अति. गट विकास अधिकारी शिरुर अं | ०२३८४ -२५०३९० | ७००९०१७०४२ |

## अग्निशमन दल - जिल्हा लातूर

| अ.क्र | कार्यालय | तालुका | दूरध्वनी क्र |
|---|---|---|---|
| १ | अग्नीशमन दल<br>श्री बालाजी खांदेवाड<br>प्र. मुख्य अग्नीशमन अधिकारी<br>लातूर | लातूर | २२२१०१, २२४९४९,<br>टोल फ्री १०१<br>९०११०३२३०१ |

# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय

## (जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण)

---

## लातूर जिल्हयातील यात्रा स्थळाची यादी

| अक्र. | गावाचे नाव | यात्रेच्या ठिकाणाचे /देवस्थानाचे /दर्ग्याचे नांव | देवस्थानाचे/दर्ग्याचे व्यवस्थापन कोणाकडे आहे | यात्रेचे स्वरुप व आकर्षक (जसे अजावळी/महापुजा/पशुप्रदर्शन स्पर्धा इ.) | यात्रेचा कालावधी | सदर यात्रेसाठी कोणकोण्यात्या गावाचे लोक येतात | यात्रेसाठी येणा-या यात्रेकरुची अंदाजे संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | लातूर | श्री सिध्देश्वर रत्नेश्वर देवस्थान यात्रा | श्री निवास लाहोटी श्री ज्ञानोबा गोरे श्री नरेश कुमार | अजाबळी नाही महापुजा/पशु प्रदर्शन/कुस्त्या/ लोककलानृत्य / दारुउडविणे | १५ दिवस | लातूर तालुका व लातूर जिल्हयातील | १५-२० लक्ष |
| २ | लातूर | हजरत सुरतशहा वळी दर्गा उरुस पटेल चौक लातूर | श्री विक्रमसींह चौव्हाण श्री रेमशसींह बिसेन | कव्वाली मुशायरा पीराचे दर्शन | ५ दिवस | लातूर तालुक्यातील सर्व लोक | ५,००० ते १०,००० |
| ३ | लातूर | हजरत शहावली ताजोद्दीन बाबा दर्गा उरुस शहाळी रोड | श्री रमेशसिंग बिसेन श्री शेख चॉंद ईस्मसाईल शेख | कव्वाली मुशायरा पीराचे दर्शन | ३ दिवस | लातूर तालुक्यातील सर्व लोक | १०००-२००० |
| ४ | लातूर | महेबुब सुभानीदर्गा उरुस | श्री राजामणीयार व उर्स कमेटी | कव्वाली मुशायरा पीराचे दर्शन | ३ दिवस | लातूर तालुक्यातील सर्व लोक | |
| ५ | लातूर | नवरात्र महोत्सव गंजगोलाई | श्री बाबुआप्पा पारशेट्टी श्री शिवाप्पा अकंल | महापूजा/सांस्कृतीक कार्यक्रम | १० दिवस | लातूर तालुक्यातील सर्व लोक | १०,००० |
| ६ | लातूर | रमझान ईद व बकरीईद | औकाफबोर्ड लातूर | नमाज पठान | १ दिवस. | लातूर तालुक्यातील सर्व लोक | ५०,००० |
| ७ | लातूर | दत्त जयंती यात्रा | विश्वला मंडळ | अजाबळी नाही महापूजा/संस्कृतीक कार्यक्रम | ३ दिवस | ---//--- | ४०,०००-५०,००० |
| ८ | लातूर | खंडोबा देवस्थान यात्रा | प्रभुआप्प खुब्बा | अजाबळी नाही महापूजा/संस्कृतीक कार्यक्रम | ५ दिवस | ---//--- | १०,००० ते१५,००० |
| ९ | उदगीर | श्री उद्दालिका ऋषि महाराज यात्रा उदगीर | श्री सतिश गिरी महाराज | .- | ७ दिवस | तालुक्यातील सर्व लोक | २०,०००द ते २५,००० |
| १० | उदगीर | श्री गुरू हावगीस्वामी यात्रा | श्री बाबूराव समगे रा. हवगीस्वामी | - | .७ दिवस | उदगीर शहर व परिसरातील कर्नाटक, | ५०,००० ते ७०,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | उदगीर | श्री सदगरु सिध्देरामेश्वर यात्रा | नागभुष्ण शेटकार | - | ११ दिवस | उदगीर शहर व परिसरातील सर्व गाव | २५,००० ते ३०,००० |
| १२ | डोंगर शेळकी ता उदगीर | श्री सर्मथ धोंडू तात्या | समर्थ धोंडू तात्या संस्थान डोंगर शेळकी | यात्रेच्या दिवसी ५.०० वाजता स्थानिक आमदार यांच्या हास्ते महापूजा | १ दिवस | लातूर जिल्हयातून व परिसरातील सर्व गावे | ५०,००० ते ६०,००० |
| १३ | शंभू उमगा उदगीर ग्रामीण | महारेवाचे मंदिर | भिमराव बिरादार कमेटी | कीर्तन सप्ताह | ४ दिवस | शेजारील सर्व गावे | २,००० ते ३,००० |
| १४ | लोहारा | हावगीस्वामी मढाची यात्रा | माधवराव हावगी राव सोनटके | कीर्तन , सप्ताह, प्रसाद | १ दिवस | शेजारील सर्व गावे | १५,०० ते २,००० |
| १५ | मुरुड | दत्त मंदीर यात्रा | मंदीर पंचकमेटी मरुड | पुजा आर्चा इ. | ३ दिवस | ३ कि.मी. अंतरावरील | ९,०००-१०,००० |
| १६ | मुरुड | तुळजाई यात्रा | ग्राम पंचकमेटी | पुजा आर्चा इ. | ६ दिवस | गावातील मंडळी | ३०००-४,००० |
| १७ | गुंफावाडी | ईसाई देवी यात्रा | ग्राम पंचकमेटी | ग्राम पंचकमेटी | १ दिवस | २ कि.मी. परिसरातील | ४,००० ते ५,००० |
| १८ | भिसेवाघोळी | दुर्गा देवीची यात्रा | ग्राम पंचकमेटी | ग्राम पंचकमेटी | १ दिवस | २ कि.मी. परिसरातील | २,००० ते ३,००० |
| १९ | ढाकणी | हजरत बंदेनवाज यात्रा | ग्रामस्थ | ग्राम पंचकमेटी | २ दिवस | २ कि.मी. परिसरातील | २,००० ते २,५०० |
| २० | भोयरा | बंदे नवाज यात्रा | ग्रामस्थ | पुज्या, आरत्याई | १ दिवस | २ कि.मी. परिसरातील | २,००० ते २,५०० |
| २१ | मांजरी | देवी मांजरी | पुजारी श्री पवार | पुजा आरत्याई | १ दिवस चैत्रपोर्णिमा | मांजरी सामागांव अकोला कारगांव भोई समुद्गगा आखरवाई | २,००० ते ३,००० |
| २२ | रामेगांव | रामळीगेश्वर मंदीर | ग्रामस्थ | पुजा आरत्या व कुस्त्या फड | ५ दिवस | गोरेगांव मुरुड आकोला | २,००० |
| २३ | सारसा | गणेशनाथमंदीर | ग्रामकमेटी सारसा | पुजा आर्चा कुस्त्या फड | ५ दिवस | देवळी टाकळगांव | २,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | चिचोंळी (ब) | काळभैरवनाथ देवस्थान | ट्रस्ट | पुजा आर्चा ई | ५ दिवस | तांदुळा गाखडा जवळील १० गावांचा | ६,००० |
| २५ | शिरुर अनंतपाळ | श्री अनंतपाळ | प्रतिष्ठान | --- | ३ दिवस | आसपासच्या | २,००० |
| २६ | साकोळ | श्री आई देवी | पुजारी | ---- | १ दिवस | गावचे लोक यात्रेसाठी येतात | १,५०० |
| २७ | साकोळ | श्री गैबीसाब | मुजावर | अजाबळी | १ दिवस | --//-- | .१,००० |
| २८ | साकोळ | श्री खंडोबा | पुजारी | -- | सप्ताह | --//-- | १,००० |
| २९ | साकोळ | श्री मल्लिकार्जुन मंदिर | पुजारी | -- | सप्ताह | --//-- | १,००० |
| ३० | कानेगाव | श्री माऊली मंदिर | पुजारी | -- | सप्ताह | --//-- | १,००० |
| ३१ | हिप्पळगाव | श्री महादेव यात्रा | पुजारी | -- | १ दिवस | --//-- | .१,५०० |
| ३२ | गणेशवाडी | श्री महादेव यात्रा | पुजारी | -- | .१ दिवस | .--//-- | १,५०० |
| ३३ | बाकली | श्री मारुती मंदिर | पुजारी | -- | १ दिवस | --//-- | २,५०० |
| ३४ | हिसाबाद | श्री गांधी यात्रा | गावकरी | २६ जानेवारी | ३ दिवस | --//-- | २,००० |
| ३५ | घुग्गी सांवगी | श्री पिराजी यात्रा | पुजारी | अजाबळी | १ दिवस | --//-- | १,००० |
| ३६ | येरोळ | श्री कालिकादेवी यात्रा | पुजारी | पुजारी | १ दिवस | --//-- | १,००० |
| ३७ | रापका | श्री ज्योतीबा यात्रा | महाराज | -- | १ दिवस | -//-- | २,००० |
| ३८ | थेरगाव | श्री प्रेमनाथ महाराज | पुजारी | -- | १ दिवस | --//-- | ५०० |
| ३९ | थेरगाव | श्री खंडोबा यात्रा | पुजारी | -- | १ दिवस | --//-- | ३०० |
| ४० | शिवपूर | श्री महालक्ष्मी मंदिर | पुजारी | अजाबळी | १ महिना | --//-- | २५० |
| ४१ | बोरफळ | महादेच मंदीर | -- | महापुजा, कुस्त्या | २ दिवस (चैत्र शु.२,३) | गावातील | ५०० |
| ४२ | हासेगांववाडी | दत्त मंदीर टेकडी | श्यामगीर कैलासगीर | दत्त महापुजा | ३ दिवस | औसा, तालुका लातूर, निलंगा, नळेगाव व हासेगांववाडी | ४००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४३ | औसा | गोपाळपूर | महाराज | जानेवारी | १५ दिवस | संपूर्ण तालुका कर्नाकट, आंधप्रदेश | १२००० |
| ४४ | औसा | खाकीपीर | इनामदार | - | ५ दिवस | संपूर्ण तालुका | १५०० |
| ४५ | औसा | तानांद्दीनबाबा | सरगुरु | - | ५ दिवस | संपूर्ण तालुका व नगर जिल्हयातील लोक | १७००० |
| ४६ | औसा | तालेबु-हान | आबुतालीब | - | ३ दिवस | संपुर्ण तालुका | ७०० |
| ४७ | औसा | महेबुसबानी | खुशिंदेसाहेब | - | ३ दिवस | संपूर्ण तालुका | ५०० |
| ४८ | औसा | खाजा भाऊद्दीन नक्शेंबंदी | इनामदार | - | ३ दिवस | संपूर्ण तालुका | २०००० |
| ४९ | औसा | सय्यद सादरत | इनामदार | - | ३ दिवस | संपूर्ण तालुका | ८०० |
| ५० | सिंदाळाध्ज | बालाजी मंदीर | रघुनाथ बापूराव हाडे | - | १ दिवस | जमालपूर हासाळा, सेलू खंटेगांव | २००-३०० |
| ५१ | याकरतपूर | जगदंबा देवस्थान | ग्रामस्थ | - | ऑक्टोंबर | करजगांव,कन्हेरी, याकतपूर, वाघोळी | ५०० |
| ५२ | जमालपूर | जमालसाहेब | मैनौद्दीन इब्राहीम पठान | संदल, गुडीपाडवा | २ दिवस | सिंदाळा | २०० |
| ५३ | बुधोडा | सिध्देश्वर यात्रा | सार्वजनीक | कुस्त्या | २ दिवस | उंगडागा बु, उंबडगा खु आलमला, सेलू पेठ लगतची सर्व गांवे | २००० |
| ५४ | बुधोडा | इस्मालखाजी | अब्दुल रसूल पटावारी | अजाबळी | २ दिवस | उंगडागा बु, उंबडगा खु आलमला, सेलू पेठ लगतची सर्व गांवे | २००० ते ३००० |
| ५५ | लामजना | शेख सुलतान शेख अब्दुला साहेब दर्गा | करीम अ गफर मुल्ला, बाबु नदीम मुल्ला | कंदोरी संदेल, कव्वाली कार्यक्रम व कुस्त्या | ४ दिवस | जावळी, तपसे चिंचोळी जोगन, मोगरगा | २००० |
| ५६ | लामजना | दत्त जयंती उत्सव | रामप्रसाद धोंडीराम बजाज | पाळण, प्रदर्शन काला | दत्त जयंती | जावळी, उत्का, चलबुंर्गा, लामजना, अपचुंदा, तांबरवाडी | ५००० |
| ५७ | महादेववाडी | महादेव मंदीर | स्वामी व ग्रामस्थ | कुस्त्या | ३ दिवस | जयनगर कन्हेरी, याकतपूर अपचुंदा | ३००० ते ४००० |
| ५८ | तपसचिंचोली | दत्त मंदीर | सिताराम निवृत्ती यादव | पुजा | दत्त जयंती | जवळगा पां. गाढवेवाडी तपसेचिंचोली | १००० ते १५०० |
| ५९ | तपसचिंचोली | इस्माईल | बशीर | नवस अजावळी | अक्षय तृ | जवळगा पां. गाढवेवाडी | १००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६० | जवळगा पोमादेवी | पोमादेवी माता | | पुजा | चैत्र पोर्णीमा | हरेगांव, गाढवेवाडी, तांडा | २००० तें २५०० |
| ६१ | जवळगा पोमादेवी | ला-डलेसाहेब | हबीब झुंबर शेख | नवस अजावळी | गुडी पाडवा | हरेगांव, गाढवेवाडी, तांडा | २००० ते २५०० |
| ६२ | हरेगांव | नामदेव देवस्थान | ट्रस्ट | पुजा | आषाढी एकादशी | लिंबाळा दा. संक्राळ, जवळगा पो बाणेगांव गुबाळ | ५००० ते ७००० |
| ६३ | लिंबाळा | केदरलिंग | ट्रस्ट | पुजा | महाशिवरात्री | हरेगांव, लिंबाळा दा | १००० ते १५०० |
| ६४ | दावतपूर | दावलमली दर्गा | फकीर | - | २ दिवस | वाघोळी, चलबुंर्गा उत्का, दावतपूर | २०० |
| ६५ | उजनी | श्री संत गणेशनाथ महाराज | गणेशनाथ सेवा मंडळ | सप्ताह १५ दिवस गोपाळ काला व कुस्त्या, शोभेची दारु, रथ मिरवणुक | ५ दिवस | ७ ते ९ गांवाचे लोक येतात | ५००० ते ७००० |
| ६६ | तांबरवाडी | महादेव मंदीर | ग्रामस्थ | जेवण व कला | श्रावण महिन्यात १ दिवस | किनीनवरे राजेर्वाडी | ५०० |
| ६७ | खरोसा | रेणूकादेवी | ग्रामस्थ | जेवण व सार्वजनीक मोठी यात्रा | २ दिवस | आनंदवाडी, शिवणीलख, जाऊ, रामेगांव निलंगा, सिंदी जवळगा, शेडोळ, किनीनवरे, लामजना, तांबरवाडी | २०,००० |
| ६८ | आलमला | विठ्ठल रुमीणी मंदी | गावातील पंच कमेटी | कुस्त्या | मकर संक्रांत | उंबडगा बु, उंबडगा खू, लखनगांव, सत्तरधरवाडी शिवुर | ५०० ते १००० |
| ६९ | खरोसा | पिरपाशदर्गा | सय्यद युनूस कादर | संदल | २ दिवस | खरोसा शिवणी लख, निलंगा | ५०० ते १००० |
| ७० | सारणी | महालक्ष्मी माता | भास्कर पाटील | पालखी (कुस्त्या) | २ दिवस | सारणी, हसलगन नांदर्गा, माकणी | ७०० ते ९०० |
| ७१ | किल्लारी | श्री निळकंटेश्वर मंदीर | विश्ववाथ मुळजे | महापुजा | १० दिवस | किल्लारी, मंगरुळ तळणी, सिरसल | ४००० ते ५००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७२ | माळकोंडजी | जलालशहा बाबा उरुस | आदम महमुद शेख | संदल | २ दिवस | माळकोंडी मसलगा, जवळगा | ७०० ते १००० |
| ७३ | किल्लारी | खंडोबा मंदीर जुना कवठा रस्ता | देवस्थान कमेटी अध्यक्ष दयानंद राम टाचले | महापुजा | २ दिवस | जवळच्या १० खेडयाचे लोक पाच्या दिवसी | ५००० ते ७००० |
| ७४ | किल्लारी | निळकंटेश्वर मंदीर नवीन गांव | देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष राजकुमार माधव जळकोटे | सप्ताह व भागवत कथा | १० दिवस | १० ते १५ गावचं लोक येतात | १३,००० ते १५,००० |
| ७५ | सिरसल | दत्त जयंती उत्सव | ग्रामपंचायत पुजा कमेटीकडे आहे | पुजा | १ दिवस | सभोवतालचे लोक येतात | ५०० |
| ७६ | तळणी | शादुल्ला वलीसाहेब दर्गा | गावकरी | नाही | अक्षय तृतीयाच्या दिवशी १ दिवस | रामवाडी तांबरवाडी व आजुबाजूचे गावातील लोक | ५०० |
| ७७ | मोगरगा | केदारलिंग देवस्थान | व्यकट गुरव | - | १ दिवस | रामवाऊी तांबरवाडी व आजुबाजूचे गावातील लोक | ४०० ते ५०० |
| ७८ | काळमाथा | महादेव मंदीर | -- | बारा गाडया ओढणे | १ दिवस आषाढ शुध्द द्वादशी | भादा उटी बोरगांव कवठा केज | १००० |
| ७९ | काळमाथा | ऊरुस पिराचा | बाबुशा तालम शेख | - | पौष पोर्णिमेनंतर पहिलया गुरुवारी | भादा उटी बोरगांव कवठा केज | २०० |
| ८० | बोरगांव न | महादेव मंदीर | बजरंग काबरा | - | १ दिवस आषाढ पोर्णिमा | काळमाथा, भेटा, भादा, कवठा केज | १२०० |
| ८१ | उंटी बु | देवीचे मंदीर | शहाजीराव जापकर | महापुजा | कोजीगीरी पोर्णिमेपासून दोन दिवस | औसा व लातूर मधील येतात | १८,००० |
| ८२ | येलोरी | मुशा खादरी दर्गा | दगडू बाशुमियाँ मुलाणी | पुजा | ३ दिवस गुडी पाडवा नंतर | येलोरीवाडी | १५० |
| ८३ | कारगळा | बाबा मशिद | सार्वजनीक | बकरी बळी | १ दिवस गुडी पाडव्याच्या आगोदर | गावातील | २०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | आदल्या दिवशी | | |
| ८४ | जायफळ | दावलमलीक दर्गा | मकतूम महमद | पुजा | आषाढी आमावस्या | परिसरातील लोक येतात | १००० |
| ८५ | शिवली | हनुमान देवस्थान | अशोक भाऊराव गुंरव | पुजा | हनुमान जयंती | १० गावातील लोक येतात | ५,००० |
| ८६ | भादा | खंडोबा देवस्थान | खंडु केशव वाघे | महापुजा, मिरवणूक कुस्त्या | डिसेंबर तीन दिवस | बोरगांव वरवडा कोरंगळा, भेटा, उटी काळमाथा हळदुर्ग लख | १००० |
| ८७ | भादा | गुलाबशहा, लतीफशहा दर्गा | बसीर पिरजादे व अब्दुल | दर्गा उत्सव | मार्च महिन्यात तीन दिवस | --//-- | ५०० |
| ८८ | भादा | मराईदेवी देवस्थान | देविदास उबाळे | जुन/जलैमध्ये अजाबळी पशु | १ दिवस | गावातील लोक | ५०० |
| ८९ | अंदोरा | आल्लाशावली दर्गा | अफजल फकीर लायक फकीर | कुस्त्या कवाल्या संदल | ३ दिवस | भेटा, भादा, बोरगांव वडजी जायफळ औसा | १०,००० |
| ९० | टाका | भिमांशकर देवस्थान | पुजारी तीन दिवसाची यात्रा कुस्त्या | ३ दिवस | ३ दिवस | बिरवली मासुर्डी एकंबी एकंबीवाडी चिंचोली का बेलकंड तावशी गुळखेडा | ४०,००० |
| ९१ | नागरसोगा | श्री हनुमान मंदीर | सार्वजनीक पुजारी (कोळी) | -- | हनुमान जयंती | तुगी, दापेगांव, वानवडा दावतपूर, जवळगा | २५०-३०० |
| ९२ | दापेगांव | हाजीमलंग साहेब दर्गा | -- | --- | गुडी पाडवा (आमवस्या) | जवळगा पो गाढवेवाडी तपसेंकचिंचोली हरेगांव नागरसोगा तुगी इ | २००-२५० |
| ९३ | आशीव | खंडोबा यात्रा | शेषेराव महिपती वाघे | कुस्त्या | २ दिवस | गावातील लोक | ५०० ते ७०० |
| ९४ | वांगजी | मोहरम | मुनीरोदीन दादमियॉ पटेल साहेबलाल इमदाद शेख | | २ दिवस | आसवासचे गावातील लोक | ७०० ते ८०० |
| ९५ | मातोळा | खंडोबा यात्रा | शंकराव भोसले व ग्रामस्थ | खंडोबाजीची कुस्त्या | ३ दिवस | मातोळा पंचक्रोशीतील | ५००० ते ७००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९६ | देवताळा | जगदंबा देवी यात्रा | जगदंबा देवी यात्रा पुजारी मंडळ देवताळा | छबीना, मिरवणूक | १५ दिवस | मराठवाडयातुन | ५००० ते ७००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९४ | वांगजी | मोहरम | मुनीरोदीन दादमियॉ पटेल साहेबलाल इमदाद शेख | -- | २ दिवस | आसवासचे गावातील लोक | ७०० ते ८०० |
| ९५ | मातोळा | खंडोबा यात्रा | शंकराव भोसले व ग्रामस्थ | खंडोबाजीची कुस्त्या | ३ दिवस | मातोळा पंचक्रोशीतील | ५००० ते ७००० |
| ९६ | देवताळा | जगदंबा देवी यात्रा | जगदंबा देवी यात्रा पुजारी मंडळ देवताळा | छबीना, मिरवणूक | १५ दिवस | मराठवाडयातुन | ५००० ते ७००० |
| ९७ | तुंगी बु | करीमशहा वली | अली पटेल मेहताब पटेल | नाही | हनुमान जयंती | -- | -- |

## यात्रा व्यवस्थापनासाठी

### प्रमाणीत अंमलबजावणी कार्यपध्दती

संदर्भ :- १) शासन परिपत्रक क्र.आरएलएफ २००९/प्र.क्र.५८/म-३/मंत्रालय मुंबई दिनांक २३/३/२००९
२) शासन परिपत्रक क्र. आरएलएफ २००९/प्र.क्र.५८/म-३/मंत्रालय मुंबई दिनांक २५/३/२००९
३) शासन परिपत्रक क्र. आरएलएफ २००९/प्र.क्र.५८/म-३/मंत्रालय मुंबई दिनांक ६५/३/२००९

**संबंधीत विभागांनी संपर्क अधिकारी नियुक्ती करणे**

१. ग्रामस्तरावरील यात्रासाठी नायब तहसिलदार व मंडळ अधिकारी यांची नियुक्ती करावी.
२. तालुका स्तरावरील यात्रासाठी तहसिलदार यांना संपर्क अधिकारी म्हणुन नियुक्ती करावे.
३. जिल्हास्तरीय यात्रासाठी उपविभागीय अधिकारी यांना संपर्क अधिकारी म्हणुन नियुक्ती करावे.
४. राज्यस्तरीय यात्रासाठी जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकारी यांची नियुक्ती करावे.

संपर्क अधिकारी यांच्या सूचना व देखरेखाली व नियंत्रणाखाली शासकीय निमशासकिय संस्था स्थानिक स्वराज्य संस्था यांचे सर्व विभागांनी कार्य करावे. त्यांना देण्यात आलेल्या आपल्या विभगाशी कार्यालय कामकाजाच्या जबाबदा-या पार पाडाव्यात. संपर्क अधिकारी यांनी संबंधित विभागातून करावयाच्या पूर्ण तयारी संदर्भात त्या त्या विभागाकडे सोपविण्यात आलेल्या जबाबदा-या व कामाची पूर्तता झाली आहे किंवा नाही. याबाबत वेळोवेळी आढावा घेवून संबंधिताकडुन पुर्तता करुन घ्यावी. सर्व संबंधित विभाग अंतर्गत सहनियंत्रण साधण्याची भूमिका संपर्क अधिकारी यांनी पार पाडावी.

### जिल्हा प्रशासनाची कर्तव्ये व कार्ये

१. मंदिर टेकडीवर असल्यास पाय-यावर कोणतीही दुकाने ठेवण्यात येवु नये. मार्ग मोकळा ठेवावा.
२. मंदिरामध्ये नारळ किंवा तेल यांचा साठा करण्यांसाठी मंदिर ट्रस्ट कडुन एक जागा निश्चित करावी. तसेच घसरण्यासाखा पदार्थ परिसर किंवा पायरीवर पसरु नये. या बाबत जिल्हाप्रशासनाने मंदीर प्रशासनामार्फत कार्यवाही करावी.
३. मंदिराभोवती असलेली जमिन शासकीय मालकीची असल्यास परिसर प्रशस्त मोकळी ठेवण्यासाठी संबंधित जिल्हाप्रशासनाने आवश्यक त्या उपाय योजना कराव्यात.
४. भाविकांच्या मार्गातील अतिक्रमणे काढुन टाकावीत.
५. आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास संबंधित जिल्हा प्रशासनामार्फत आवश्यकतेनुसार आपत्तीगृस्तांना अर्थीक मदत देण्यात यावी.
६. प्रमाणित कार्यपध्दती तयार करताना संबंधित विभागाच्या अधिकां-याची कर्तव्य व जदाबदारी निश्चित करावी. जिल्हा व राज्यस्तरावर यात्राच्या वेळी संबंधित विभागीय आयुक्त, क्षेत्रीय कार्यालयावर देखरेख ठेवतील.

यात्राच्या नियोजनानुसार अमंलबजावणी करण्यासाठी कार्यकारी यंत्राणेला काही विशिष्ट प्रथांचे अडथळे निर्माण होत असतात. अशा अनिष्ठ प्रथाविरुध्द भाविकांचे मत परिवर्तनाची नितांत गरज आहे. अशा अनिष्ठ प्रथांचे समूळ उच्चाटन करण्याकरिता जिल्हा प्रशासनाने ट्रस्ट व्यवस्थापकीय मंडळाकडून, स्थानिक लोकप्रतिनिधीची मदत घेवुन या विषया संदर्भात भाविकांचे सतत प्रबोधन होणे देखील आवश्यक आहे.

### मंदिर परिसर / यात्रा व्यवस्थापन मंडळ

१. मंदिर परिसर प्रशस्त व मोकळा करण्यात यावा.
२. भाविकांसाठी दर्शन करण्यासाठी दोन स्वतंत्र मार्ग (जाण्यासाठी / येण्यासाठी) ठेवण्यात यावे.
३. भाविकांच्या मार्गातील अतिक्रमणे / अडथळे काढून टाकावीत.
४. व्यवस्थापन मंडळाची एक प्रस्तावित कार्यपध्दती तयार करुन ती जिल्हाधिकारी यांचेंकडुन प्रमाणित करुन घ्यावी.
५. देवस्थान मंडळाची एक जबाबदार व्यक्ती संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करावी.
६. यात्राचे तारखा निश्चित करुन प्रसिध्द कराव्यात.
७. भाविकांच्या येण्याजाण्याच्या मार्गवरील अतिक्रमण काढून घ्यावीत. त्यासाठी स्टॉल व दुकांनाची संख्या मर्यादित करुन मार्गातील सर्व प्रकारचे अडथळे दूर करावीत.
८. भाविकांच्या मार्गावरील पाय-या दुरुस्ती कराव्यात. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे मार्गदर्शन घ्यावे.
९. मंदिर परिसरात भाविकांच्या रांगा लावण्यासाठी व गाभा-यासाठी दर्शन घेतलेले भाविकांना बाहेर काढण्यासाठी विविध शैक्षणिक संस्था / संघटना / मंडळे यांचे मदतीने पुरेशा प्रमाणात स्वयसेवक नेमणे गर्दीत ओळखू येतील असा गणवेश पुरवण्यात यावा.
१०. स्वयंसवेकांच्या राहण्याची, भोजनाची व्यवस्था पहावी.

---

११. मंदिर परिसरात भाविकांची गर्दीचा विचार करुन त्यांच्या सुलभ आणि सुरक्षित हालचाली करिता पोलीसच्या आराखडानुसार देवस्थान परिसरात पुरेशी जागा उपलब्ध करुन घेणे व बॅरेकेडिंग करुन घेणे आवश्यक आहे.
१२. मंदिर परिसर स्वच्छ ठेवण्यात यावा. वयोवृध्द नागरीक व बालकांना, तसेच भाविकांच्या प्रवेश मार्गावर ओलसर पाण्यांमुळे किंवा नाराळया पाण्यामुळे पायाखाली निरसडेपणा होणार नाही या बाबत दक्षता घ्यावी.
१३. बंदोबस्त कर्तव्यावरील पोलीस अधिकारी, कर्मचारी व गृहरक्षकदल, अग्निशामक दल यांचे निवास व भोजन व्यवस्थेसाठी पुरेशी जागा उपलब्ध करुन घ्यावी
१४. यात्रेच्या नियंत्रण कक्ष साठी जागा उपलब्ध करुन द्यावी.
१५. पुजापाठ दिक्षा, नवस, अदि कारणास्तव भाविकांच्या श्रध्दांचा फायदा घेण्यासाठी प्रसंगावर आळा बसण्यासाठी धर्मादाय आयुक्त याचे मार्फत यात्रा ठिकणी तक्रार नोंदविण्यासाठी केंद्गे उभारण्यात यावीत.
१६. देवस्थान स्वच्छ व निर्मळ ठेवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करणे व भाविकांमध्ये तशी भावना रुजवणे याकरिता ट्रस्ट / व्यवस्थापकीय मंडळ यांनी प्राध्याना द्यावे.
१७. पुजा पाठ दक्षिणा मिळकत व वहिवाटीच्या हक्कांवरुन ज्या देवस्थान ट्रस्टमध्ये वाद आहेत ते त्वरीत निकाली काढण्यात यावीत. यासाठी धर्मादाय आयुक्त मार्फत स्वतंत्र लोकन्यायालय आयोजन करण्यात यावी.
१८. सेवाभावी वैद्यकीय संस्था व संघटनांशी संपर्क साधून त्यांच्याकडून डॉक्टर्स, नर्सेस औषधी वैद्यकीय साधने इत्यादी मिळविण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे सहकार्य घ्यावे. यात्रा व मंदिर परिसरात दोन वेगवेगळया ठिकाणी किमान दोन अग्नीशामक सुसज्ज ठेवावेत. पटांगणात यात्राची स्टॉल दुकाने असल्यास प्रशस्त रस्ते असावेत. आग्णीशमन वाहनास जाता येईल असे प्रमुख रस्ते असावेत.
१९. यात्रा परिसरातील व त्या तालुक्यातील अवैध दारु उत्पादन व विक्री पूर्णपणे निष्प्रभ करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागास अशा उत्पादन व विक्री ठिकाणाची माहिती स्थानिक नागरिक व भाविक यांचकडून मिळवून सादर करावी.
२०. उपहारगृहे व खादयपदार्थ विक्री केद्गाना जागेची परवानगी देतांना त्यांना अन्न व औषध भेसळ विभागाकडील ना हरकत परवाने अनिर्वाय आहे.
२१. पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्था, परिसर स्वच्छता, पुरेशा संख्येने स्वच्छता गृहे व निवास व्यवस्था करण्यात यावी.
२२. सुसज्ज ध्वनीक्षेपण यंत्रण, धोक्याची सूचना देणारी यंत्रणा, सुरक्षित वाहन पार्कींग व्यवस्था करण्यात यावी. यात्रेकरुंच्या शंका निरसणसाठी व तक्रार निवारण्यासाठी सोयीच्या ठिकाणी नियंत्रण कक्ष स्थापन करावेत.

**जिल्हा शल्य चिकित्सक**

१. वैद्यकीय व्यवस्थेसाठी किमान २००० चौ.फु. जागा यात्रा या ठिकाणी उपलब्ध करुन घ्यावीत. तेथे पेन्डॉल उभारण्यात यावा आवश्यक फर्निचर व सोयी (टेबल, खुर्च्या, तपासणी बेड, विद्यूत पुरवठा, पंखे इ) उपलब्ध करुन घ्याव्यात.
२. सेवा भावी संस्था (वैद्यकीय) व संघटनांशी संपर्क साधुन त्यांच्या कडुन डॉक्टर्स, नर्सेस, औषधी साधने इत्यादी मिळवण्यासाठी सर्व स्तरावरुन प्रयत्न करावा.

---

३. भाविकांसाठी किमान तीन ठिकाणी स्थायी वैद्यकीय सुविधा पुरवाव्यात व एक वैद्यकीय पथक फिरते ठेवावे. यासाठी जरुरी भसल्यास सेवाभावी वैद्यकीय संस्था संघटनांची मदत घेवुन त्यांच्या कडून डॉक्टर्स, नर्सेस, औषधी वैद्यकीय सांधने इत्यादी उपलब्ध करुन घ्यावेत.
४. पुरेशा प्रमाणात प्राणवायु, जीवरक्षक औषधे व सुविधा असलेली रुग्णवाहीका वैद्यकीय पथकाकडे सुसज्ज ठेवाव्यात.
५. ग्रामीण रुग्णालयात यात्रा काळात तज्ञ डॉक्टर्स व अनुभवी स्टाफ नेमण्यात यावा.
६. यात्रा परिसर निरोगी व स्वच्छ राहील अशा उपाय योजना कराव्यात.
७. साथीच्या आजार बाबत प्रतिबंधक उपाय योजना खात्रीशीरपणे हाती घ्याव्यात.
८. मंदिर व यात्रा परिसर येथे भाविकांना पाण्याची कमतरता पडू नेय अशी व्यवस्था होईल असे करावे.
९. शुध्द व निर्जंतूकीकरण केलेलेच पाणी लोकांना दिल्या जात आहे याची खात्री करुन व पाणी नमुने नियमितपणे गोळा करुन तपासणी करुन दूषित पाणी नमुन्या बाबत घेणे माशा, किटक मुक्त परिसर, स्वच्छते बाबत योग्य ती दक्षता घ्यावी

## पोलीस विभाग

१. वाहतुक नियत्रंण नियमन हा कोणत्याही यात्रेतील महत्वाचा घटक आहे.पोलीस विभागाचे यात्रा कालावधीसाठी अध्ंिसुचना काढुन प्रचलित वाहतुक मार्गात जरुरीप्रमाणे करुन घ्यावेत.वाहने पार्किंग मर्यादा निश्चित करावी व त्यास पुरेशी जाहीर प्रसिध्दी द्यावी. जिल्हयातील प्रत्येक यात्रेसाठीचा वाहतुक मार्गाचा आराखडा निश्चित करुन ठेवण्यात यावा.
२. यात्रेतील संभाव्य कायदा व सुव्यवस्था गुन्हे नियंत्रण आणि सुरक्षितेच्या अभ्यास करुन पोलीस कर्मचारी व गृहरक्षक असे आवश्यक कर्मचारी किमान ३०० लोक, बंदोबस्तासाठी नेमावेत. त्यात किमान २० अधिकारी व जरुरी प्रमाणे महिला कर्मचारी नियुक्त करावेत. जिल्हयातील प्रत्येक यात्रेसाठीचा पदनिहाय बंदोबस्त प्लॅन तयार करुन ठेवण्यात यावा
३. बंदोबस्तासाठी नेमलेले सर्व अधिकारी व कर्मचारी यांना त्यांचे डयुटीचे ठिकाणी आणि त्यांनी करावयाच्या कर्तव्याची माहिती करुन देवुन काही करणाने आणंिबाणीची परिस्थिती निर्माण झाल्यास प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांची काय भुमिका असावी व त्यातील प्रत्येकाने त्यावेळी काय कर्तव्य पार पाडावे,त्याबाबत सर्वाना पुरेसे व सखोल मार्गदर्शन करावे.
४. मंदिर परिसरातील गर्दीचा अभ्यास करुन गर्दी नियंत्रणासाठी उभारावे लागणारे अडथळे कशा पध्दतीने उभारावेत,या बाबत आराखडा तयार करुन तो अध्यक्ष, देवस्थान ट्रस्ट यांना पुरवावा.
५. पोलीस अधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी प्रांत अधिकारी यांचे सोबत यात्रास्थळास भेट देवुन पोलीसांच्या निवास व भोजन व्यवस्थेसाठी देवस्थान ट्रस्ट कडुन जागा उपलब्ध करुन घ्यावी. देवस्थान ट्रस्ट कडुन नेमण्यात आलेल्या स्वयंसवेकांना त्यांचे कर्तव्याचे ठिकाण नेमुन द्यावे आणि काही कारणाणे आणिबाणीची परिस्थिती निर्माण झाल्यास त्यावेळी त्यांची काय भुमिका असावी व त्यातील प्रत्यकाने काय कर्तव्य पार पाडावे याबाबत सर्वांना सखोल मार्गदर्शन करावे व प्रशिक्षण द्यावे.
६. धोक्याची सुचना देणारी यंत्रणा, सुरक्षित वाहन पार्किंग व्यवस्था तसेच भाविकांच्या शंका निरसनासाठी व तक्रार निवारणासाठी सोयीच्या ठिकाणी नियंत्रण कक्ष उभारावे.

---

संबंधितांनी आवश्यक ती काळजी घेण्याबाबत पुढील प्रमाणे मार्गदर्शक सुचना प्रसृत करण्यात येत आहेत.

१ जिल्हा विशेघ शाखेकडील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडुन तसेच घातपातविरोधी पथकाकडुन देवस्थान परिसर, मंदीर व मिरवणूकीचा मार्ग तपासणी करुन घ्यावा.

२ मिरवणूक दरम्यान तसेच भाविकांचे दर्शनाचे रांगेत, स्नानाच्या ठिकाणी,बस स्टँड इ.ठिकाणी समाजविघातक कृत्य करणारे पाकिटमारी करणारे इसमांवर ठेवणेकामी स्थानिक गुन्हे शाखेकडील कर्मचाऱ्यांनी नेमणुक करावी.

३. नो पार्किंग झोन घोषित करण्यासाठी अधिसूचना जाहीर करावी.

४. महत्वाच्या ठिकाणी पोलीस चौक्या उभारुन त्यात बिनतारी संच,रोप बॅटरी व राखीव स्टाफ नेमावा.

५. व्हीडीओ ग्रॉफर यांना गर्दीतील हालचालींचे चित्रीकरण करण्यासाठी नेमण्यात यावे.

६. ध्वनीक्षेपणाव्दारे अगर मेगाफानेव्दारे भाविकांना सूचना देणे.

७. काही अनुचित प्रकार घडण्याची शक्यता विचारात घेऊन त्यावेळी करावाच्या कार्यवाहीसाठी आपत्कालीन योजना तयार करण्यात यावे व सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्याप्रमाणे अवगत करुन त्यांची रंगीत तालीम घेण्यात यावी.

८. मिरवणूक मार्गाची अधिसूचना जाहीर करण्यात यावी.

९. मंदीरात प्रवेश करण्याच्या ठिकाणी बिनतारी संदेश विभागाकडुन धातूशोधकव्दारे (डी.एफ.एम.डी.) बसवून घ्यावेत.

१०. भाविकाना मंदिरात सोडतांना टप्या-टप्याने सोडवण्यात यावे.

११. मंदिरात प्रवेश घेण्यासाठी व बाहेर पडण्यासाठी दोन वेगवेगळे मार्ग असावेत.

१२. गर्दीच्या मार्गावर मनोरा उभारुन तेथुन दुर्बिणीव्दारे गर्दीतील हालचालीवर लक्ष ठेवण्यात यावे व तसा अनुचित प्रकार आढळल्यास नजिकाच्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून तात्काळ कार्यवाही करावी.

१३. गर्दीचे ठिकाणी मोकाट जनावरे फिरणार नाहीत या बाबत दक्षता घ्यावी.

१४. यात्रेत घडणाऱ्या घडामोडी बाबत वेळोवेळी माहिती पोलीस ठाण्यात देण्यात यावी व पोलीस ठाणे अंमलदार यांनी नियत्रंण कक्षास कळवावी.

१५ जर अपघात झाला तर कायदा व सुव्यवस्था परिस्थिती निर्माण होऊन चेंगराचेंगरी होऊ शकते म्हणुन गर्दीत कोणीही चारचाकी/दुचाकी वाहने नेणार नाही यांची दक्षता घ्यावी.

१६ पोलीस विभागाने यात्रेदरम्यान महाराष्ट्र राज्य विद्दुत मंडळ,सार्वजनीक बांधकाम विभाग, देवस्थान ट्रस्ट राज्य परिवहन महामंडळ,प्रादेशिक मोटार परिवहन,ग्रामपंचायत/नगरपालिका सदस्य, नागरिक तसेच जिल्हयातील गृहरक्षक दल,स्वेच्छेने काम करणाऱ्या अशासकीय संस्था यांचेशी समन्वय ठेवावा. त्यांचबरोबर वेळोवेळी बैठका घेण्यात याव्यात.

## <u>जिल्हापरिषद व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था</u>

१. यात्रे ठिकाणी भाविकांसाठी किमान तीन ठिकाणी स्थायी वैद्दकीय सुविधा पुरवाव्यात व एक वैद्दकीय अधिकारी पथक फिरते ठेवावे. यासाठी सेवाभावी संस्था व संघटनाची मदत घ्यावी. डॉक्टर्स, नर्सेस औषधी वैद्दकीय साधने इत्यादी साधने उपलब्ध करुन घ्यावी.

२. पुरेशा प्रमाणात प्राणवायु जीवरक्षक व सुविधा असलेल्या रुग्णवाहिका व वैद्दकीय पथकांकडे सुसज्ज ठेवाव्यात

३. यात्रेत नेमण्यात येणाऱ्या वैद्दकीय पथकासह प्राथमिक आरोग्य केंन्द्ग मांढरदेव व ग्रामीण

---

रुग्णालयात अनुभवी व तज्ञ डॉक्टर्स व अनुभवी स्टाफ नेमण्यात यावा.

४. यात्रा परिसर निरोगी व स्वच्छ राहील अशा उपायोजना कराव्यात.

५. साथीच्या रोगाबाबत प्रतिबंधक लसीकरण करावे.

६. मंदीर व यात्रा परिसर येथे भाविकांना पाण्याची कमतरता पडु नये म्हणुन तात्पुरता नलिका पाणी पुरवठा करावा. भाविकांसाठी गर्दी एकवंटणार नाही अशा अंदाजाने ठिक ठिकाणी पाण्याचे किमान २० नळ पुरवावेत.

७. भाविकांसाठी तात्पुरती चरीची शौचालये व फिरते सुलभ शौचालये पुरेशा संख्येने (स्त्रिया व पुरषाकरिता) स्वतंत्र उपलब्ध करुन द्यावेत.

८. पुरेशी सुरक्षीत वाहन पार्किग व्यवस्था व लागा,पुरेशी वैद्कीय व अग्नीश्ामन सेवा इत्यादी बाबतची व्यवस्था करण्यात यावी.

**<u>सार्वजनिक बांधकाम विभाग</u>**

१. यात्रेच्या ठिकाणी घाटामध्ये रस्त्यांची जरुरी नुसार दुरुस्ती करुन घ्यावी. त्यावर ठिकठिकाणी वळणे व उतार यासंबंधीची मार्गदर्शक व अनिवार्य वाहतुक चिन्हे लावून घ्यावीत. यात्रेच्या घाटच्या ठिकाणी संरक्षक कठडे बांधुन घ्यावेत. भाविकांच्या परतीच्या मार्गावरील आवश्यकतेनुसार उतार काढून त्याठिकाणी समान मापाच्या एकसारख्या उंचीच्या पाय-या किमान महाद्वारपर्यंत तयार करुन घेण्यासाठी तज्ञांचे मार्गदर्शनाखाली आराखडा तयार करावा. त्यासाठी आवश्यक ती रक्कम देवस्थान ट्रस्ट कडून उपलब्ध करुन घेऊन हे काम यात्रेपुर्वी किमान २० दिवस अगोदर पुर्ण करण्यात यावा.

**<u>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी</u>**

१ बेकायदेशीर तसेच नियमबाहय विद्युत वापर आणि असुरक्षित जोडण्या शोधण्यासाठी स्वतंत्र पथके तयार करुन अशा जोडण्याचा शोध घेऊन त्याबाबत कायेदीशीर कार्यवाही करावी व अशा जोडण्या बंद कराव्यात. विद्युत पुरवठा खंडीत होणे हे घातपाताचे कारण होऊ शकते म्हणून याबाबत सदैव सतर्क राहून अखंडित वीज पुरवावी. तसेच फिडर्सच्या नियंत्रक अधिका-यांशी संपर्क ठेवावा व पुरवठा सुनिश्चित ठेवावा. यात्रा परिसरात आवश्यक तेवढी पथके २४ तास कार्यरत ठेवावीत.

---

## एस.टी.महामंडळ

१. भाविकांच्या गर्दीचा अंदाज घेवुन गरजेनुसार पुरेशा संख्येने एस.टी.बसेस उपलब्ध ठेवाव्यात.
२. दरवर्षी यात्रांच्या प्रवासी संख्येची आकडेवारी ठेवावी.
३. सर्वचालक व वाहक यांना त्यांनी भाविकाशी सौजन्याने वागण्याच्या आणिबाणी परिस्थितीत करावयाच्य कर्तव्याबाबत आगाऊ मार्गदर्शन करावे.

## अन्न व औषध प्रशासन

१. यात्रेतील उपहारगृहे व खाद्यपदार्थ विक्री केंद्र यांना कायदेशीर परवाने द्यावेत.
२. उपहारगृहे खाद्यपदार्थ विक्री केंद्र अचानक तपासून भेसळयुक्त अन्नपदार्थ विक्रेते यांचेवर कायदेशीर कारवाही करावी. तसेच यात्रेत विषबाधा या सारखा प्रकार होणार नाही यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी.

# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
## (जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण)

---

**पडताळणी यादी (चेकलिस्ट)**

| अ.क्र. | तपशील | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | रस्त रुंद आहे का | |
| २ | भाविकांच्या येण्या-जाण्याचे स्वतंत्र मार्ग आहेत का | |
| ३ | वाहतुकीची व्यवस्था करण्यात आली आहे का | |
| ४ | आणिबाणीच्या परिस्थतीसाठी हॉटलाईन वायरलेस उपकरणांची व्यवस्था आहे/नाही | |
| ५ | नियंत्रण कक्ष व सी.सी.टी.व्ही.ची यंत्रण सुसज्ज आहे/ नाही | |
| ६ | आपत्कालीन मार्ग आहे / नाही | |
| ७ | बॅरेक्सची व्यवस्था पुरेशी मजबूत आहे / नाही | |
| ८ | पोलीस दल, गृहरक्षक दले स्वयंसेवक उपलब्ध आहे/ नाही | |
| ९ | नाराळ फोडण्याची स्वतंत्र जागा नेमली आहे / नाही | |
| १० | कत्तलखान्याची व्यवस्था केली आहे / नाही. | |
| ११ | भाविकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे / नाही | |
| १२ | स्वच्छता व्यवस्था प्रसाधन गृहाची व्यवस्था केली आहे / नाही | |
| १३ | तात्पुरते दुकाने लावण्यासाठी सुरक्षित अंतराची मर्यादा ठेवली आहे / नाही | |
| १४ | सदर दुकानांना तात्पुरते परवाने दिले आहे / नाही | |
| १५ | भाविकांच्या वाहतुकीसाठी एस.टी.व्यवस्था करण्यात आली आहे / नाही. | |
| १६ | वाहने पार्कींगची व्यवस्था आहे / नाही | |
| १७ | वाहतुकीचा ओघ नियंत्रित करण्यासाठी यंत्रणा उभी करण्यात आली आहे/नाही | |
| १८ | सुरक्षित विद्यूत पुरवठा करण्यात आला आहे / नाही | |
| १९ | अग्निरोधक यंत्रणा उपलब्ध आहे / नाही | |
| २० | रुग्णवाहीकेस सुसज्ज वैद्यकीय कुमक उपलब्ध आहे / नाही | |
| २१ | उपहारगृहे, हॉटेल व अन्य खादय पदार्थाच्या दुकानात भेसळयुक्त पदार्थ नाही याची खात्री केली आहे / नाही | |

---

**पोलीस बंदोबस्त**

१. एकुण अधिकारी, राज्य पोलीस / राखीव पोलीस बल
२. एकुण पोलीस संख्या
३. त्यांचे निवास भोजन व्यवस्था,
४. शौचालय व स्वच्छता गृह व्यवस्था
५. एकुण बंदोबस्ताच्या जागा
६. तैनातीचा कालावधी (दिवस व रात्रपाळी)
७. प्रत्येक पॉईटवरील वरीष्ठ अधिकारी
८. दिलेली जबाबदारी / एकूण पॉईट्स किती
९. समाज कंटकांवरती करण्यात आलेली कार्यवाही
१०. वाहन-व्यक्ती-तपासणी यंत्रणा
११. एकूण उपलब्ध वाहने
१२. हत्यारी पोलीस-प्रकार-संख्या
१३. रॅपीड ॲक्शन फोर्स-संख्या-वाहने
१४. वाहतुक नियोजन आराखडा नकाशा
१५. वहातुक कर्मचारी संख्या
१६. स्टँडर्ड ऑपरेटींग प्रोसीजर
१७. एकूण बार-त्यावरील बंदी-तारखा
१८. देशी बार-अवैध धंदे ताडी गुत्ते
१९. चेकींग नाके किती ? जागा
२०. एकूण बायनाक्युलर्स
२१. गडावरील कंट्रोल रुम कोठे आहे.
२२. रस्ते वाहतूक मार्गावरील एकूण कर्मचारी वहातूक नियमन, प्रमुख अधिकारी,कर्मचारी संख्या
२३. कर्मचा-यांना प्रशिक्षण
२४. संशयीत वाहन, व्यक्ती तपासणी नाका.
२५. बाँब डिस्पोजल युनीट
२६. श्वान पथक आहे ? नाही ?
२७. पोस्टमार्टम व्यवस्था
२८. एकूण हॉटेल्सची माहिती-चेकींग
२९. अवैध धंदे-वेशा-जुगार-दारु-मटका बंद-सक्तीने
३०. अफवा उठणार नाहीत, खबरदारी
३१. मार्गावर नक्षलवादी अस्तीत्वाच्या खुणा आढळल्याने विशेष बंदोबस्त अपेक्षीत.
३२. भाविकांशी शक्यतो मवाळतेने वागा.
३३. वायरलेस ऑपरेटर्स-रेंज-उपलब्धता

.

---

## अन्न व औषधे विभाग

१. एकूण हॉटेल्स किती

२. तयार मालाची तपासणी

३. सविस्तर सुचना व नियम

४. त्यासंबंधीचे माहिती बोर्ड

५. हॉटेल आग सुरक्षा सक्तीची

६. तात्पुरत्या हॉटेलची परवानगी-सुरक्षा-मालाची प्रत

७. डास, माशा, उंदीर यांचा बंदोबस्त

८. एकूण अधिकारी व सहाय्यक नांव - फोन

## सार्वजनिक बांधकाम

१. रेस्ट हाऊस, संख्या फोन
२. संबंधीत रस्त्यांची डागडुजी
३. धोक्याच्या जागा-सुचना पाटी
४. दर्शन रांगेमधील व्यवस्था
५. एस.टी.बस थांबा ते मंदीर मार्गाची विशेष व्यवस्था
६. अचानक येणा-या आपत्ती साठीचे कर्मचारी व साहित्य
७. प्रमुख अधिकारी नांव फोन
८. एकूण वाहने - ड्रायव्हर नांव फोन
९. एकूण बिगारी - उपलब्ध ठिकाण
१०. मंदीर मार्ग दुरुस्ती, सुचना फलक
११. एकेरी मार्ग, नो एन्ट्री, धोक्याचे वळण इ. प्रत्येक ठिकाणी निर्देश फलक
१२. पाणी व्यवस्था

## पाणी व्यवस्था

१. पाण्याचे टँकर्स- लहान तोटया असलेले किती
२. एकूण संख्या ? एकूण कर्मचारी - अधिकारी फोन नं.
३. निचरा व्यवस्था- योग्य- पाहिजे.

---

## आरोग्य विभाग

१. प्रमुख अधिकारी नांव : फोन :
२. सहाय्यक नांव : फोन :
३. एकूण डॉक्टर्स
४. एकूण नर्स
५. एकूण ॲम्ब्युलन्स
६. ड्रायव्हर नांवे - फोन जागा
७. संभाव्य धोका - आजार नांवे
८. लागणारी औषधी - पुरवठा
९. वैद्‍यकीय सुविधा एकूण जागा
१०. एकूण स्ट्रेचर्स
११. जवळची सर्व मोठी हॉस्पीटल्स फोन
१२. कर्मचा-यांचे नियोजन दिवस / रात्री
१३. निवास भोजन व्यवस्था
१४. अतिदक्षता विभाग कोठे, नांव, अंतर
१५. वैद्‍यकीय सुविधा बुथ - लाईट पाणि व्यवस्था
१६. सुरक्षा रक्षक

## स्वच्छता विभाग

१. कचरा हटवणारे एकूण कर्मचारी
२. त्यांची साधने
३. कचरा एकत्रिकरण व्यवस्था
४ कचरा टाकण्यासाठी गाडया
५. एकूण शौचालय, स्वच्छता गृहे
६. त्याकरिता पाण्याची व्यवस्था
७. शौचालयातील कर्मचारी स्वच्छता
८. माशा व डासा करिता फवारणी
९. फवारे उपलब्धता किती
१०. स्वच्छतेच्या वेळा

---

## विद्यूत महामंडळ

| | | |
|---|---|---|
| १. | यात्रा काळातील विजेचे वितरण किती | |
| २. | एकूण उपलब्धता आणि प्रत्यक्ष मागणी | |
| ३. | विज उपलब्ध असण्याच्या निश्चीत वेळा व त्यांचे विवरण दिवसागणीक वेळापत्रक | |
| ४. | एस.टी.स्थानकावरील सुविधा | |
| ५. | स्थानक ते मंदिर मार्गावरील रस्त्यांवरील दिवे | |
| ६. | मंदिरातील दर्शन मार्गावरील सुविधा | |
| ७. | धोक्याच्या इशा-याचे फलक | |
| ८. | विज प्रवाह बंद करण्याचे एकूण पॉईंट त्यांचा योग्य नकाशा | |
| ९. | प्रमुख अधिकारी नांव | फोन |
| १०. | सहाय्यक नांव | फोन |
| ११. | मुख्य ऑफीस | फोन |
| १२. | मंदिरातील ऑफीस | फोन |
| १३. | विज धक्का बसल्यास करण्याचे उपाय फलक | |
| १४. | सुरक्षा उपाय फलक | |

## प्रादेशिक परिवहन

१. येणा-या व जाणा-या गाडयांसाठी स्वतंत्र स्थानक-वेगळी जागा फलकांसह
२. मुख्य अधिकारी - तंत्रज्ञ
३. सहाय्यक कर्मचारी
४. ध्वनी क्षेपक योग्य प्रमाणात
५. येणा-या जाणा-या गाडयांचे नियोजन
६. दुरुस्ती विभाग-कर्मचारी
७. वाहन चालक व इतर कर्मचारी निवास व्यवस्था
८. स्थानकाचे सपाटीकरण - पाणी शौचालय
९. कँटीन व्यवस्था, आरोग्य सुविधा, स्वच्छता.
१०. हरवले - सापडले- बुथ - मार्गदर्शक व्यवस्था
११. वाहतूक पोलीस सहाय्य

## श्री. सिध्देश्वर रत्नेश्वर देवस्थान यात्रा, लातूरसाठीचा आराखडा

- लातूर जिल्हयामध्ये श्री.सिध्देश्वर रत्नेश्वर देवस्थान ट्रस्ट नोंदणीकृत आहे. या अशासकीय संस्थेच्या वतीने मंदिराची देखभाल व यात्रेचे नियोजन करण्यांत येते.
- देवालय मंदीरा भोवती एकूण ६ पक्के बांधकाम असलेल्या खोल्या उपलब्ध आहे.
- स्वायंपाकगृह व भोजनगृह स्वतंत्र आहे. सर्वसाधरणपणे १००० भावीकांची भोजनाची व्यवस्था करण्यांच्या दृष्टीने साहित्य उपलब्ध आहे.
- मंदिर देवालयाचा एकूण परिसर २५ एकर आहे. संपूर्ण जमीन यात्रेसाठी उपलब्ध असते.
- यात्रेचा कालावधी दरवर्षी महाशिवरात्री पासून पुढे पंधरा दिवसाचा असतो.
- यात्रेसाठी महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश, गुजरात, उत्तरप्रदेश, ओरीसा, राजस्थान इत्यादी राज्यातून भावीक लातूर येथे येतात.
- लातूर जिल्हा आंध्रप्रदेश, कर्नाटक व मध्यप्रदेश यांच्या सिमेलगत असून शिव व सिध्देश्वराचे भक्त असलेले भावीक या यात्रेसाठी मोठया प्रमाणावर लातूर येथे दाखल होतात.
- यात्रे निमित्य प्रतिदिवशी १ लक्ष भावीक दर्शनासाठी येतात व सर्वसाधरणपणे १५ दिवसाच्या यात्रे निमित्य या यात्रेस भेट देणा-या भाविकांची संख्या २० लक्ष पर्यंत आहे.

  सद्यस्थितीत एम.टी.डी.सी.च्या निधीतून यात्री निवासाचे काम सुरु असून त्यासाठी शासनाने रु ३५७ लक्ष ऐवढा निधी मंजूर केलेला असून त्यामध्ये एकूण १६ रुमचे व मोठया सभागृहाचे बांधकाम पुर्णत्वास आलेले आहे.

### दर्शन व्यवस्था

- महाशिवरात्रीच्या पहिल्या रात्री म्हणजे प्रारंभी गावळी समाजा तर्फे दुग्धभिषेक सोहळा आयोजन करण्यांत येतो. त्या वेळी दर्शनासाठी महिला व पुरुषांच्या स्वतंत्र रांगा मंदिराच्या डाव्या व उजव्या बाजूने करण्यांत येतात. त्यासाठी बॅरेकेटींग करण्यांत येते. गर्दीच्या नियोजनासाठी यात्रा समितीच्या वतीने ३०० स्वयंसेवक व ५० टास्क फोर्स ५० खाजगी सुरक्षा रक्षक नेमण्यांत येतात. मंदीर सपाट जागेवर असून डोंगर भागाचा टेकडीचा या मंदीराशी व मंदिराकडे याणा-या मार्गाशी संबंध नाही. मंदिरास सपाट १० पाय-या आहेत. त्यामुळे दर्शनासाठी भावीकांना नैसर्गिक अडचणी नाहीत. सुरक्षेसाठी बॅकरेकटींग करण्यांत येते.

- मंदिरासाठी प्रवेश समोरच्या द्वारातून देण्यांत येतो व दर्शन झाल्यानंतर बाहेर पडण्यांसाठी मंदिराच्या उजव्या बाजूच्या द्वाराचा उपयोग करण्यांत येतो.
- नारळ फोडणे :- भावीकांना नारळ फोडण्यांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यांत आलेली आहे. त्या ठिकाणी २४ तासासाठी दोन स्वतंत्र व्यक्तीची नेमणूक करण्यांत येते. भावीकांची नारळ ते फोडून देतात त्यामध्ये नाराळाच्या टरकल व खोबरे व पाणी स्वतंत्र करुन दिले जाते. नारळातून निघणा-या पाण्यांचा भावीकाशी संबंधी येत नाही. सदरचे पाण्याचा निचरा होणेसाठी स्वतंत्र पाईपलाईन करण्यांत आलेली असून सदरचे पाणी मंदिरा बाहेर शोध खड्डया पर्यंत पोहचते. त्यामुळे स्वच्छता राहते.

  भावींच्या वतीने मंदिरात वाहण्यांत येणा-या वात, धुप, कापुर, उदबत्या व तेल या साठी यज्ञ कुंड असून त्या ठिकाणी पुजरी नियुक्त असतात. त्यांच्या हस्ते सदरचे पुजा साहित्य यज्ञ कुंडामध्ये अपुर्ण करण्यांत येते. त्या ठिकाणी तेलाचा निसरडा प्रकार होत नाही.

## आयोजन

यात्रा समितीच्या वतीने यात्रा संयोजन मुख्य समिती, व दर्शन, पास समिती, भोजन समिती, भजन किर्तन समिती, पाणी व्यवस्था समिती, स्वच्छता समिती, आरोग्य समिती, क्रीडा समिती, संरक्षण समिती, कुस्ती समिती, कृषि पशु प्रदर्शन समिती, विद्यूत व डेकोरेश समिती, प्रसिध्दी समिती, स्वयंसेवक समिती, अभिषेक समिती, पुष्प सजावट समिती, पार्कींग व्यवस्था समिती, इत्यादी समित्या गठीत करण्यांत येवून प्रत्येक समितीवर सर्व साधरणपणे १० समिती सदस्य व २५ सहायक काम करतात. असे एकूण ३००-३५० व्यक्तींच्या वतीने यात्रा नियोजन करण्यांत येते.

## करमणूक साधने

यात्रे निमित्य राहटपाळणे, जॉईंट व्हील, मौत का कुंआ, टोरा-टोरा, जादूचे खेळ, आकाशी नाव, वॉटर पार्क, रेल्वे व लहान मोठे पाळणे, तसेच लोकनाटय तमाशा मंडळ, लावणी महोत्सव, इत्यादीचे आयोजन करण्यांत येते. या सर्वांसाठी तहसीलदार यांच्याकडून व इतर आवश्यक प्राधिका-याकडून परवाने काढण्यांत येतात.

## हॉटेल्स

यात्रेसाठी मोठया प्रमाणावर जनतेची रेलचेल असल्यामुळे सर्वसाधारण पणे ५० हॉटेल्स या परिसरामध्ये उभारण्यांत येतात. यासाठी संबंधीत प्राधिकारी यांच्याकडून परवाने घेण्यांचे बंधनकारक असून त्यावर अन्न व औषध प्रशासन विभागाच्या निरिक्षकाचे नियंत्रण असते. अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने अन्न निरिक्षक यांची नियुक्ती यात्रेसाठी करण्यात येते.

---

## सुरक्षा व्यवस्था

- यात्रा समितीच्या वतीने ४०० स्वयंसेवक नेमण्यांत येतात.
- पोलीस विभागाच्या वतीने २०० अधिकारी / कर्मचारी नियुक्त असतात.
- प्रत्येक करमणूकीचे साधने, साहित्य विक्रीच्या स्टॉल व राहाट पाळणे यांची स्वतंत्र सुरक्षा व्यवथा असते.

## पार्कींग व्यवस्था

शहरातून मंदिराकडे प्रवेश करण्यांचे एकूण ३ मार्ग असून सर्व मार्गावर स्वतंत्र पार्कींग व्यवस्था असून. त्या ठिकाणी दुचाकी वाहने तीनचाकी वाहने व चारचाकी वाहने यांची स्वतंत्र व्यवस्था असते व त्यासाठी वेगळी जागा नेमणू देण्यांत आलेली असून यात्रा आरखडयामध्ये त्याचा समावेश असतो. पार्कींग व्यवस्थेच्या ठिकाणी कोणतेही ज्वालागृही पदार्थ ठेवण्यांत येत नाहीत. सदरची व्यवस्था कंत्राटदारास लिलाव पध्दतीने देण्यांत येते. ज्यामुळे वाहनांची सुरक्षा चांगल्या प्रकारे होते. व वाहन चोरी होण्यांचा प्रकार होत नाही. शहर वाहतूक बसेस साठी स्वतंत्र व्यवस्था असून त्या ठिकाणी एका वेळी २५ बसेस थांबतील ऐवढी जागा आरक्षीत करण्यांत आलेली असते.

## विद्यूत व्यवस्था

- महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनीच्या वतीने यात्राच्या नियोजनासाठी या परिसरामध्ये दोन डी.पी. बसविण्यांत आल्या असून त्या द्वारे पुरसा विद्यूत पुरवठा होतो.
- विद्यूत मंडळाचे २ उपअभियंता, ४ अभियंते व १५ लाईनमन नियुक्त करण्यांत आलेले असतात. विद्यूत पुरवठयासाठी एक कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात येते. सदरचा कंत्राटदार मंडळाच्या वतीने विद्यूत विकत घेवून छोटया दुकानदारास पुरवठा करतो व त्या पोटीचे देयक मंडळास दाखल करतो. त्यामुळे कंत्राटदार व विद्यूत विभाग यांच्या समन्वयाने विद्यूत पुरवठा होतो व कोठेही शॉर्टसर्कीट होणार नाही याची दक्षता घेण्यांत येते.
- लाईट गेल्यास कंत्राटदाराकडे, मंदिर व्यवस्थापनाकडे व पाणी पुरवठादाराकडे जनरेटरची व्यवस्था आहे.

---

**अग्निशामक**

नगर परिषद, लातूर यांच्या वतीने यात्रेच्या ठिकाणी संपुर्ण वेळेसाठी एक मोठे वाहन ४ कर्मचारी सदैव तत्पर असतात. सदरचे वाहन यात्रेच्या कोणत्याही भागापर्यंत पाहेचेल अश्या पध्दतीने स्टॉलची उभारणी करुन रस्ते सोडण्यांचे काम आयोजन समितीच्या वतीने करण्यांत येते. अंतर्गत रोड ६० फूटाचे असून मोठे चौक १० आहेत.

**ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी**

यात्रेच्या संपुर्ण परिसरामध्ये १० चौक असून त्या ठिकाणी मोठे मनोर उभारण्यांत येतात. या मनो-यावर व्हिडीओ कॅमेरी लावण्यांत येवून सर्व कॅमेरी एका नियंत्रण कक्षाशी जोडण्यांत आलेले असतात. तसेच या मनो-यावरुन मोठे ध्वनीक्षेपन यंत्रे बसविण्यांत आलेले आहेत.  त्यामुळे आवश्यकता भासल्यास कोणत्याही सुचना जनतेस तात्काळ व सर्वत्र एकाच वेळी देण्यांत येतात. चोर, व अफवा यांच्यापासून बचावासाठी ही यंत्रणा प्रभावीपणे काम पहाते.

**आपत्ती व्यवस्थापन**

- यात्रेचे स्वरुप व यांत्रसाठी भेट देणा-यांची संख्या मोठया प्रमाणावर असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने या ठिकाणी आपत्ती व्यवस्थापनाचा स्वतंत्र स्टॉल लावण्यांत येतो.  या द्वारे जनतेस जनजागृतीचे साहित्य वाटप करण्यांत येते.  तसेच पथनाटयाचे अयोजन करण्यांत येते.
- भूकंप रोधक घराचे मॉडल या ठिकाणी ठेवण्यांत येते व या बाबतची तांत्रीक माहिती असणारे कर्मचारी नियुक्त करण्यांत येतात त्या द्वारे जनेतेस भूकंपरोधक घरे बांधण्याचे प्रबोधन करण्यांत येते.
- तसेच भूकंप, आग, विज, वादळ, इत्यादी सारख्या नैसर्गीक आपत्तीस सामोरी जाण्यांसाठीच्या उपायोजना करणे या आपत्तीची तिव्रता कमी करण्यांसाठी नियोजन करणे संबंधी साहित्य वाटप व जनजागृती करण्यांत येते.
- सन २००८ मध्ये लातूर जिल्हा रौप्य महोत्सव वर्षा निमित्य आपत्ती व्यवस्थपनाचे स्टॉल उभारण्यांत आले होते.  सदरच्या स्टॉलचे उद्घाटन मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यांत आले होते. तसेच या स्टॉला मा. गृहमंत्री, भारत सरकार यांनी भेट दिलेली आहे.  त्यांच्या हस्ते आपत्ती व्यवस्थापन विषयक पुस्तीकेचे विमोचन करण्यांत आलेले आहे.
- या स्टॉलसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, नेहरु युवा केंद्राचे युवक व सुरक्षेसाठी होमगार्डस् यांची नेमणूक करण्यात येते.

## महानगरपालिका, लातूर

- यात्रेसाठी मोठया प्रमाणावर जनतेची आवक असल्यामुळे व मंदिर, यात्रा परिसर लातूर शहरापासून नजीकच्या अंतरावर असल्यामुळे त्या ठिकाणी वाहतूकीसाठी शहर वाहतूक बसेस सोडण्यांत येतात. नगर परिषदेच्या वतीने शहर वाहतूकीचे कंत्राट दिलेले असून यात्रा कालावधीसाठी एकूण २५ मिनीबसेस कंत्राटदाराच्या वतीने २४ तास सुरु असतात.
- पाणी पुरवठया साठी यात्रा आयोजन समितीच्या वतीने कायमच्या ७ टाक्या उभारण्यांत आलेल्या असून त्या शिवाय ११ टॅंकरची व्यवस्था असते.
- दोन फिरते स्वच्छतागृह महिला व पुरुषासाठी स्वतंत्र ठेवण्यांत आलेले असून. ट्रस्टच्या वतीने एका स्वतंत्र परिसरा मध्ये तात्पुरते स्वच्छतागृह उभी करण्यांत आलेली आहेत. त्यामुळे कोणत्याही प्रकारची दुर्गंधी परिसरा पसरणार नाही. याची दक्षता घेण्यांत येते.
- नगर परिषदेने घण कच-यासाठीचे कंत्राट दिलेले असून त्यांच्या मार्फत तसेच ट्रस्टच्या वतीने परिसरातील कचारा स्थलांतरीत करण्यांत येतो. त्या सर्व कामावर नियंत्रणासाठी ३ निरिक्षक व २५ कर्मचारी नियुक्त करण्यांत येतात.
- तसेच अग्निशामक व्यवस्था देखील करण्यांत येते. या परिसरामध्ये संपुर्ण २४ तासासाठी एक मोठे अग्निशामक वाहन कामय ठेवण्यांत येते त्यावर पुरसे अधिकारी कर्मचारी यांची नियुक्त करण्यांत येतात.
- त्या शिवाय अग्निशामक विभागात एमआयडीसी मध्ये व गांधी चौक या ठिकाणी सुसज्य अशी वाहने २४ सेवेसाठी उपलब्ध असतात.

## आरोग्य व्यवस्था

- जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या वतीने व जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या वतीने एकूण १५ आरोग्य स्टॉल यात्रेच्या ठिकाणी उभारण्यांत येतात. यामध्ये १ ॲम्ब्यूलन्स, ऑक्सीजन व्यवस्थेसह सज्य असते तसेच अशासकीय संस्थेच्या वतीने ५ ॲम्ब्यूलन्स पुरविण्यांत येतात.
- या कालावधीत साथीच्या रोगावर लसीकरण करण्यांत येते.
- आरोग्य विषयक जनजागृती स्टॉल उभारण्यांत येतात.
- तसेच या कामी ५ डॉक्टरर्स, ७-१० नर्स यांची व मदतनीस यांची नियुक्ती करण्यांत येते.
- पुरेसा औषधाचा साठा ठेवण्यांत येतो.
- समन्वयक म्हणून वैद्यकीय अधिकारी, लातूर हे काम पहातात.

पोलीस विभाग

- लातूर जिल्हयामध्ये श्री.सिध्देश्वर रत्नेश्वर देवस्थान यात्रेच्या निमित्याने पुरेसा बंदोबस्त ठेवण्यांत येतो.
- बंदोबस्त कामी एकूण २५ अधिकारी नियुक्त करण्यांत येतात.
- त्याच बरोबर ९५ पोलीस १०० होमगार्डस् यांची नेमणूक करण्यांत येते.
- यामध्ये सर्वसाधरणपणे ४५ महिला कर्मचा-याची नेमणूक केलेली असते.
- रस्ते सुरक्षेसाठी वाहतूक विभागाचे ५ कर्मचारी नियुक्त करण्यांत येतात त्यांच्या मदतीस १० वार्डनची नेमणूक करण्यांत येते.
- वाहतूक शाखेकडे एकूण १५ बॅरेकेट व खाजगी १० बॅरेकेट उपलब्ध आहेत. त्यांचा वापर वाहतूकीस नियंत्रणासाठी करण्यांत येतो.
- तसेच साध्या वेषातील पोलीस यात्रेमध्ये गर्दीच्या ठिकाणी फिरुन चोर व अफवा पसरवणारे यांच्यावर पाळत ठेवून असतात.
  - कायदा व सुव्यवस्था
  - यात्रेच्या समन्वयासाठी उपविभागीय अधिकारी, लातूर यांची नियुक्ती करण्यांत येते.
  - जिल्हादंडाधिकारी, लातूर यांच्या वतीने यात्रा कालावधीत कायदा व सुव्यवस्थेचे काम पहाण्यांत येते. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने आदेश पारीत करण्यांत येतात.